**धनगर समाज बांधवाच्या विकासासाठी विशेष कार्यक्रम**

**भटक्या जमाती-क या प्रवर्गातील धनगर समाजातील बेजारोजगार युवक-युवतींना लष्करातील सैनिक भरती व राज्यातील पोलिस भरतीसाठी आवश्यक ते प्रशिक्षण देणे.**

**महाराष्ट्र शासन**

**इमाव, सावशैमाप्र, विजाभज, विमाप्र कल्याण विभाग**

**शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण-२०१९/प्र.क्र.०४/विजाभज-१**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-३२.

दिनांक : ०६ सप्टेंबर, २०१९

**वाचा :** शासन निर्णय विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभाग क्रमांक सीबीसी-२०१९/ प्र.क्र.१२१/मावक, दिनांक ७/८/२०१९.

**प्रस्तावना:-**

भटक्या जमाती-क या प्रवर्गातील धनगर समाजातील युवक-युवतींना लष्करातील सैनिक भरती व राज्यातील पोलिस भरतीसाठी भरतीपुर्व प्रशिक्षण नसल्याने ते या क्षेत्रामध्ये यशस्वी होत नाहीत भटक्या जमाती-क या प्रवर्गातील धनगर समाजातील सुशिक्षित बेरोजगार युवक-युवतींची संख्या लक्षणीय आहे.

२. युवकांमध्ये सैन्य व पोलिस भरतीसाठी प्रशिक्षणाचा अभाव असल्यामुळे बऱ्याच वेळेस व सक्षम असताना देखील त्यांना संधी मिळत नाही. ही उणिव भरुन काढण्यासाठी भटक्या जमाती-क या प्रवर्गातील धनगर समाजातील युवक/युवतींना लष्करातील सैनिक भरती व राज्यातील पोलिस भरतीसाठी पूर्व प्रशिक्षण देणे आवश्यक आहे.

३. जुलै, २०१९ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात मा. मंत्री (वित्त व नियोजन) यांनी केलेल्या अर्थसंकल्पीय भाषणात धनगर समाजाच्या विकासासाठी विविध २२ योजना राबविण्याचा शासनाचा मानस असल्याची घोषणा करण्यात आली आहे. सदर घोषणेची अंमलबजावणीसाठी रुपये १०००.०० कोटी एवढा निधीची अर्थसंकल्पीय तरतुद करण्याची घोषणा करण्यात आली आहे. गेली अनेक वर्षे विकासापासून दूर असलेल्या भटक्या जमाती-क प्रवर्गातील धनगर समाजातील लोकांचा सर्वागीन विकास व्हावा व त्यांना स्थिरता यावी यासाठी भटक्या जमाती-क प्रवर्गातील धनगर समाजातील युवक-युवतींना लष्करातील सैनिक भरती व राज्यातील पोलिस भरतीसाठी पूर्व प्रशिक्षण देण्याची योजना कार्यान्वित करणे आवश्यक आहे.

४. भटक्या जमाती-क या प्रवर्गातील धनगर समाजातील बेरोजगार युवक-युवतींना कोणत्याही शाखेतील पदवी अभ्यासक्रम किमान ६० टक्क्यासह उत्तीर्ण झालेल्या गुणवंत विद्यार्थ्यांना सारथी या स्वायत्त या संस्थेच्या धर्तीवर नव्याने स्थापन करण्यात येणाऱ्या संस्थेच्या माध्यमातून लष्करातील सैनिक भरती व राज्यातील पोलीस भरतीसाठी आवश्यक ते मुलभूत प्रशिक्षण देण्याच्या प्रस्तावास दिनांक ३०.७.२०१९ रोजी मा. मंत्रिमंडळाच्या बैठकीत सादर करण्यात आला होता त्यास मा. मंत्रिमंडळाने मान्यता दिली आहे. मा. मंत्रिमंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार भटक्या जमाती-क प्रवर्गातील धनगर समाजातील बेरोजगार युवक-युवतींसाठी पदवी अभ्यासक्रम किमान ६० टक्के गुणासह उत्तीर्ण केलेल्या युवक-युवतींना लष्करातील सैनिक भरती व राज्यातील पोलिस

भरतीसाठी पूर्व प्रशिक्षण देऊन स्पर्धा परिक्षा देण्यासाठी आवश्यक ती तयारी “महाज्योती” या संस्थेच्या माध्यमातून ही योजना राबविण्यासाठी व यासाठी रुपये ५.०० कोटी इतका निधी मंजूर करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-**

वर प्रस्तावनेत नमूद केल्याप्रमाणे मा. मंत्रिमंडळाने दिनांक ३०/७/२०१९ रोजी झालेल्या बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार भटक्या जमाती-क प्रवर्गातील धनगर समाजातील विद्यार्थ्यांसाठी पदवी अभ्यासक्रम किमान ६० टक्के गुणासह उत्तीर्ण केलेल्या विद्यार्थ्यांना लष्करातील सैनिक भरती व राज्यातील पोलिस भरतीसाठी पूर्व प्रशिक्षण देणे, स्पर्धा परिक्षेत भाग घेणाऱ्या युवक व युवतींना यशस्वीपणे सामोरे जाण्यासाठी आवश्यक ती पुर्व तयारी करणे यासाठी आवश्यक ते मुलभूत प्रशिक्षण देण्यासाठी “महाज्योती” या संस्थेच्या माध्यमातून ही योजना राबविण्यास तसेच यासाठी रुपये ५.०० कोटी इतका निधी मंजूर करण्यास शासन याद्वारे मान्यता देण्यात येत आहे.

२. सदरहू योजनेसाठी रुपये ५.०० कोटी (पाच कोटी फक्त) इतका निधी मंजूर करण्यात येत असून सदरहू निधी महात्मा ज्योतीबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती) या संस्थेस उपलब्ध करुन देण्यात यावी. महात्मा ज्योतीबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती) या संस्थेने सदरहू प्रशिक्षण योजना शासनाच्या मान्यतेने राबवावी व याबाबतचा अहवाल शासनास सादर करावा. महाज्योती या संस्थेने यासाठी योजना राबविण्यापूर्वी योजनेचे विविध घटक / अर्थसंकल्प यांची या विभागाकडून वेगळी मान्यता घेऊन राबवावी.

३. या योजनेसाठी सन २०१९-२० या आर्थिक वर्षातील खर्च वरील लेखाशिर्षाखाली मंजूर अनुदानातून खर्च करावा व २०२०-२१ या वर्षाकरिता या प्रयोजनासाठी महालेखापाल, महाराष्ट्र राज्य यांच्याकडून स्वतंत्र लेखाशिर्ष मजूर करुन घेण्यास व त्यामध्ये निधी अर्थसंकल्पित करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय नियोजन विभाग व वित्त विभागाचा अनौपचारिक संदर्भ क्र....., दिनांक ०५/०९/२०१९ अन्वये दिलेल्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे. वित्त विभागाने सूचविल्या प्रमाणे नियोजन विभागानी दिलेल्या अभिप्रायाच्या अधिन राहून हा शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्रमांक २०१९०९०६१८०२३७८२२२ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने

Bhaurao Raghunath Gavit

Digitally signed by Bhaurao Raghunath Gavit
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=VJNT OBCS SBC Welfare Dept., postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=692454783803b1bf08be0ff2505a01eb578c61edfbb827457be5704f5b440067, serialNumber=950bc6a64b0801087d4b403d7351619557bcd3489ca14b4e0f644bf05a04e89c, cn=Bhaurao Raghunath Gavit
Date: 2019.09.06 18:08:24 +05'30'

**( भा. र. गावित )**

**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा.राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई.

२. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा.मंत्री (विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा.राज्यमंत्री (विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. मा. मुख्य सचिव यांचे सह सचिव, मंत्रालय, मुंबई
६. सर्व मंत्री / राज्यमंत्री यांचे खा.स. मंत्रालय, मुंबई
७. मा. विरोधी पक्ष (विधान परिषद), विधानभवन, मुंबई
८. मा. विरोधी पक्ष (विधान सभा), विधानभवन, मुंबई
९. सर्व मा. विधानसभा सदस्य / विधानपरिषद सदस्य, विधानमंडळ, मुंबई.
१०. महालेखापाल (लेखापरीक्षा/लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर.
११. सर्व अप्पर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव सर्व मंत्रालयीन विभाग
१२. प्रधान सचिव (विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभाग), मंत्रालय, मुंबई.
१३. प्रधान सचिव (ग्राम विकास विभाग), बांधकाम भवन, मुंबई.
१४. संचालक, विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण संचालनालय, पुणे.
१५. जिल्हाधिकारी (सर्व)
१६. मुख्य कार्यकारी अधिकारी (सर्व) जिल्हा परिषद
१७. व्यवस्थापकीय संचालक, महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था द्वारा, छत्रपति शाहू महाराज मानव विकास, संशोधन व प्रशिक्षण संस्था, बालचित्रवाणी, गोपाल गणेश आगरकर रोड, सेनापती बापट रोडच्या मागे, पुणे - ४११ ००४.
१८. प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण विभाग (सर्व)
१९. सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण (सर्व)
२०. जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
२१. निवडनस्ती (विजाभज-१).